R.N.I.16775/68 Regd. No. MCW-126/2018-20, Published on 15th of every month.



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार

एकूण पाने १६ प्रती अंक रु. ५/-

वर्ष ५३ वे, अंक १ ला, मुंबई. नोव्हेंबर २०१९ वार्षिक वर्गणी रु. ५०/-

## अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई - ४०००१६.

दूरभाषः २४३०२२७३, २४३०७५७३ द्रुतमुद्रणः aadrbm@gmail.com संकेतस्थळः www.adrbmmhamim.in

### वार्षिक सर्वसाधारण सभेची अग्रसूचना

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, माहीम, मुंबई ४०००१६ या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक १४ डिसेंबर २०१९ रोजी दुपारी ४.०० वाजता लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई ४०००१६ येथे मंडळाच्या सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.

**वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषय**

१) दिनांक १५ जुलै २०१८ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मंजूर करणे.

२) आर्थिक वर्ष २०१८-२०१९ चा अहवाल व सनदीलेखापालाने मंजूर केलेल्या हिशेब पत्रके व ताळेबंदास मंजूरी देणे.

३) सन १९-२० व २०-२१ या वर्षाचे अंदाज पत्रक मंजूर करणे.

४) अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय यावर चर्चा करणे.

सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती

**मुंबई, दिनांक : ८ नोव्हेंबर २०१९**

**अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ**

श्री. विलास विनायक जोशी, अध्यक्ष

टिपः आर्थिक ताळेबंद हिशेब पत्रके या संबंधी सभासदांस काही विचारणा किंवा सुचना करावयची असल्यास कृपया दि. १०/१२/२०१९ पूर्वी संस्थेच्या कार्यालयात लेखी स्वरुपात देण्यात याव्यात.

**विशेष सुचना :** वर्ष १८-१९ याचा अहवाल व तसेच सनदीलेखापालने मंजूर केलेल्या प्रती आपल्याला पोस्टाने पाठविण्यात येतील.

## डोंबीवली येथे २४/११/१९, रविवार रोजी ऋग्वेद परिषद

दे.ऋ.ब्रा. संघ, डोंबिवली संस्थेने ५० व्या वर्षात पदार्पण केले आहे. याबद्दल संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे व सभासदांचे हार्दिक अभिनंदन! त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा! डोंबिवली संस्थेने सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त रविवार दिनांक २४.११.२०१९ (पूर्ण दिवस) रोजी पी.पी. चेंबर्स, सर्वोदय हॉल, ३रा मजला, डोंबिवली (पूर्व) येथे ऋग्वेद परिषद आयोजित केली आहे. दे.ऋ.ब्रा. संस्था ही संलग्न संस्थापैकी एक आदर्श संस्था असून त्यांचे तीन हजाराच्यावर सभासद आहेत. प्रतिवर्षी ते अनेक धार्मिक कार्यक्रम करतात. उदा. दासनवमी, नवरात्रउत्सव, इत्यादी व त्यांच्या सर्व कार्यक्रमांना सभासद उत्स्फूर्तपणे दाद देत असतात. संस्थेचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची युवा शाखा अतिशय जोमाने कार्य करीत आहे. ही युवा शाखा नित्यनेमाने अनेक सामाजिक उपक्रम राबवित आहे. त्याबद्दल त्यांचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. संलग्न संस्थापैकी आमच्या माहितीप्रमाणे नाशिक व सोलापूर येथे युवक शाखा कार्यरत आहे. सर्व संलग्न संस्थांना विनंती की त्यांनी डोंबिवली, नाशिक व सोलापूर या संस्थांचा आदर्श घेऊन युवकशाखा निर्माण करण्यात व संस्थेचे व्यवस्थापन पुढील काळात युवा वर्गाकडे कसे जाईल या संबंधाने कालबद्ध कार्यक्रम आखावा. तसेच मध्यवर्ती मंडळामध्येही अधिक अधिक युवकांनी भाग घ्यावा व येणाऱ्या जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडाव्यात. दे.ऋ.ब्रा. संघ डोंबिवली सुवर्ण महोत्सवानिमित्त स्मरणिका काढत आहे. त्याला जास्तीतजास्त जाहिराती देऊन प्रतिसाद द्यावा ही विनंती.



अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाची मुखपत्रिका

**समाचार**

वर्ष ५३ वे, अंक १ ला,
नोव्हेंबर २०१९

( फक्त सभासदांसाठी)

❖❖❖

**श्री. विलास जोशी**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. प्रसाद ठकार**
कार्यवाह

❖❖❖

***संपादक समिती***

श्री. प्रभाकर अ. संत
डॉ. लक्ष्मीकांत दाणी
श्री. शरद पां. पारसनीस
श्री. प्रमोद नाईक
श्री. बापूराव कुलकर्णी

❖❖❖

**अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही**

**आजीव सभासद वर्गणी ५०० रुपये**
**प्रति अंक ५ रुपये**

**दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३**

**ई मेल :** aadrbm@gmail.com
**संकेत स्थळ :** www.adrbmmahim.in

# संपादकीय

## ब्राह्मण समाजाने खोलवर विचार करुन कलंक धूवन काढावा!

मी महिन्यातून दोन तीन ठिकाणी ज्येष्ठांच्या मेळाव्यांत / मंडळात जात असतो. त्यावेळी मी आवर्जून ज्येष्ठांना वृद्धापकाळच्या अडचणींचा इशारा देत असतो. जरा कांही झाले की हॉस्पीटलमध्ये भरती करण्यांत येते. तेथे चार पाच टेस्ट घेण्यात येतात. त्याचे बील पन्नास/साठ हजाराच्या घरांत येते. असे दोन चार वेळा करावे लागल्यास २/३ लाखाची पूंजी संपते. पुढे दुर्दैवाने पुन्हा हॉस्पीटल मध्ये जाणे भाग पडले तर आर्थिक प्रश्न अत्यंत त्रासदायक ठरतो. आप्तेष्ट थोडी फार मदत करतात पण त्याला मर्यादा असतात. माझ्या माहीतीच्या दोन/तीन वृद्धांच्या बाबतींत सगळे पर्याय संपल्यावर आप्तेष्टांनी त्यांच्या मरणाचीच वाट पाहिली व कांहीही न करता सरकारी हॉस्पीटलमध्ये मरेपर्यंत वाट पाहिली. म्हणून त्या जेष्ठांच्या संस्थाना वृद्धांसाठी कल्याण निधी संकलन करा असे आवाहन करतो. व त्याप्रमाणे त्या संस्था कार्यरत होतात.

प्रसंगी प्रश्नाचे गांभीर्य अधिक लक्षांत यावे म्हणून सांगतो की अलीकडे तरुण सुनांना सासु सासरे अडगळ वाटते व त्यासाठी त्या नवऱ्यांकडे हट्ट धरुन वेगळे होतात व सासु सासऱ्यांवर एकाकी जीवन लादतात किंवा त्यांना वृद्धाश्रमांत टाकतात. अशानांही मदतीचा हात देणे आवश्यक ठरते. म्हणून ज्येष्ठांच्या संघटनांनी ज्येष्ठ कल्याण निधी मोठ्या प्रमाणांत संकलीत करावा असेही आवाहन करतो. धक्का देणारी गोष्ट म्हणजे अशा दोन तीन संमेलनांत कांही जणांनी मुले आई वडलांना एकाकी जीवन लादतात किंवा वृद्धाश्रमांत टाकतात ही समस्या फक्त ब्राह्मण समाजांतच आहे. अन्य समाजांत असे कोणीही करत नाही असा प्रतिवाद केला. आक्षेप गंभीर असून वस्तुस्थीतीच तशी असल्याने ब्राह्मण समाजाने खोलवर विचार करत उपरोक्त कलंक धुवून काढावा! यासाठी शर्थीचे प्रयत्न केले पाहिजेत. आवश्यक ते संस्कार रुजवले पाहिजेत व हा कलंक धुवून काढला पाहिजे. हे प्रमाण अलीकडे वाढत चालले आहे ही बाबही दुर्दैवी आहे. प्रश्न कलंक धूण्याचा आहे व तरुणांच्या किमान कर्तव्याचाही आहे. म्हणून खोलवर विचार करुन अनेक उपक्रम राबवून हा कलंक धुवून काढावा ही कळकळीची विनंती.

या विषयात प्रतीवाद करता येण्यासारखा आहे याची जाणीव असली तरी प्रतीवाद न करतां ज्या चुका सुधारायला हव्यात त्या चुकांचा प्राधान्याने विचार करुन त्या दुरुस्त करणे यांतच प्रगतीचा मार्ग असतो हे लक्षांत घेणे आवश्यक आहे. ब्राह्मण समाज प्रगल्भ असला तरी जागतीक रेट्याने समाजांत कांही अयोग्य गोष्टी घडत असतात. नको तेव्हढे व्यक्ती स्वातत्र्यांचे स्तोम माजवले जाते. हे गांभीर्याने लक्षांत घेऊन वरील विषयांत सर्वजण विचार करुन, निश्चीत कार्यक्रम आखून, उपक्रम योजून हा कलंक दूर करा एव्हढेच मागणे आहे. या शिवायही कांही दोष जागतीक रेटयाने व नको तेव्हढ्या व्यक्ती स्वातंत्र्याने आले आहेत. त्या विषयांतही अन्य समाज टिकात्मक टिप्पणी करत असतो. ब्राह्मण ज्ञातीचे समाजधुरीण यातून निश्चीत मार्ग काढतील असा विश्वास प्रगट करुन लेखणीस विराम देत आहे.

**महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्यांत व तालूक्यांत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण ही संस्था असते. ठाणे जिल्ह्यातील अशा संस्थांची माहिती खाली दिली आहे. सर्वांनी आपापल्या जिल्ह्यातील व तालूक्यातील विधी सेवा प्राधिकरणाची माहिती मिळवणे व खाली दिलेल्या माहितीचा आपापल्या ठिकाणी सुयोग्य उपयोग करुन घेणे. - संपादक**

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे

न्याय सेवा सदन, पहिला मजला, ठाणे जिल्हा न्यायालय परिसर, ठाणे - ४०० ६०१.
दुरध्वनी क्र. : ०२२-२५४७६४४१ फॅक्स क्र.: ०२२-२५४७६४४१ ई-मेल : legalaidthane@yahoo.com

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे हे लिगल सर्व्हिसेस ऑथॅरीटी ॲक्ट, १९८७ नुसार स्थापन झाले आहे. माननीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश हे प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष तर वरिष्ठ स्तर न्यायाधीश हे सचिव असतात, तालुका स्तरावर तालुका विधी सेवा समिती असते. प्राधिकरण व समितीतर्फे पुढील योजना राबविल्या जातात.

• पात्र गरजु लोकांना मोफत कायदेशीर मदत व सरकार तर्फे वकील उपलब्ध करुन देणे. • लोकन्यायालयाचे आयोजन (झटपट तडजोड व दोन्हीही पक्षांना मान्य होईल असा निकाल) • कारागृहातील पुरुष व महिला कैद्यांना मोफत कायदेशीर मदत. • विधीसंघर्षग्रस्त बालकांना मोफत कायदेशीर मदत. • मध्यस्थी केंद्रामार्फत प्रलंबीत प्रकरणे सामोपचाराने सोडविणे. • कायदे विषयक शिबीरे / पथनाट्य घेवून समाजात कायद्याबाबत जनजागृती. • अंधश्रद्धा निर्मुलनासाठी जनजागृती व जादुटोणा विरोधी कायद्याची माहिती देणे. • वादपुर्व प्रकरणे उदा. बँकांची कर्जप्रकरणे, मोबाईल कंपन्यांचे थकीत बिलासंबंधी वाद, विज बिला संबंधी वाद. नगरपालिका कर संबंधीचे वाद लोकन्यायालयात सामोपचाराने सोडविणे. • योजना राबविण्यासाठी विधी स्वयंसेवकांची नेमणुक करणे. • शासनाच्या विविध कायदेशीर अधिकार कामाच्या ठिकाणी होणारे लैंगिक शोषण या बाबत जनजागृती करुन मदत करणे. • गर्भलिंगनिदान प्रतिबंध कायद्याविषयी जनजागृती तसेच बेटी बचाव बेटी पढाव योजना प्रसार व प्रचार करणे. • असंघटीत क्षेत्रातील कामगारांच्या हक्क व अधिकाराबाबत जनजागृती व त्यांना कायदेशीर मदत व मार्गदर्शन करणे. • देह व्यापाराला बळी पडलेल्या महिला व मुली यांना कायदेशीर मदत करुन जनजागृती करुन त्यांना मदत करणे. • मनोरुग्ण तसेच मानसिक विकलांग व्यक्तींना औषधोपचार घेण्यासाठी मदत तसेच मोफत कायदेशीर मदत देवून शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे. • गरीबी निर्मूलन प्रभावी अंमलबजावणी योजने अंतर्गत गरीब व दारिद्रय रेषेखालील लोकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे. • तृतीय पंथीय व्यक्तींना कायदेशीर मदत तसेच शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे. • ज्येष्ठ नागरीक, निराधार, निराश्रीत लोकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यास मदत करणे. • बालमजुरी प्रतिबंध व बालकामगार कायद्याबाबत जनजागृती करणे. • रॅगींग विरोधी कायदा, सायबर गुन्हेगारी व शिक्षणाच्या अधिकाराबाबत जनजागृती करणे. • एच.आय.व्ही. बाधीत व्यक्तींच्या अधिकाराबाबत जनजागृती करणे व त्यांना वैद्यकीय उपचार मिळवून देण्यास मदत करणे. • मानवाधिकारांबाबत जनजागृती करुन मानवाधिकारांचे रक्षण करणे. **तरी वरील सर्व विषयांशी संबंधित आपणास कुठल्याही प्रकाराची कायदेशीर मदत हवी असल्यास जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अथवा तालुका स्तरावर संबंधित न्यायालयातील तालुका विधी समितीशी संपर्क साधावा. तालुका विधी सेवा समिती येथील संपर्क :** वसई : ०२५०-२३२५४८५, पालघर : ०२५२५ - २५६७५४, जव्हार : ०२५२०-२२२५६५, डहाणू : ०२५२८ - २२२१६०, वाडा : ०२५२६ - २७२६७२, भिवंडी : ०२५२२ - २५३२५०, शहापूर : ०२५२७-२७२०१६, उल्हासनगर : ०२५१-२५६०३८८, नवी मुंबई : २७५८००८२, कल्याण : ०२५१ - २२०५७७०, मुरबाड : ०२५२४ - २२२४३३

---

**सवलतीची कुपन्स :** रेमंड मिल, स्पेशालिटी हॉटेल, तज महाल हॉटेल आणि ओबेराय हॉटेल्सची सवलतीची कुपन्स मध्यवर्ती मंडळाच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. इच्छुक सभासदांनी लाभ घ्यावा. रेमंड मिल १२.५% सवलत, हॉटेल्स - ३०% सवलत. - **प्रमोद नाईक**

# विधी सेवा प्राधिकरण कायदेविषयक माहिती

**कार्ये : विधी सेवा प्राधिकरण/समिती द्वारा निम्न लिखित कार्ये केली जातात.** ❖ न्यायालय / न्यायाधिकरण / प्राधिकरण समक्ष कोणतेही प्रकरण किंवा इतर कायदेशीर कार्यवाही चालविण्याच्या प्रक्रियेत समुपदेशनाच्या स्वरुपात मोफत विधी सहाय्य पुरविणे आणि मोफत विधी सेवा पुरविणे.❖ खर्च व वेळेची बचत करुन तसेच तांत्रिक बाबींचा अडसर टाळून जलदगतीने न्याय मिळवून देण्याच्या हमी करीता, प्रलंबित प्रकरणांमध्ये तसेच असे वाद जे न्यायालयासमक्ष आणले गेले नाहीत अशा वादांमध्ये सुद्धा समझोता करीता लोक ल्यायालय आयोजित करणे.❖ वैवाहिक वाद मध्यस्थ आणि समेट पद्धतीने मिटविणे.❖ कज्जे वादातील पक्षकार आणि सर्व सामान्य जनतेत, सामाजिक व विधी दृष्ट्या महत्वाच्या मुद्दयांवर कायदेशीर बाबीसंबंधी जागरुकता निर्माण करणे.❖कैद्यांना आणि न्यायाधिन बंदींना मोफत विधी सेवा प्रदान करणे. **विधि सहाय्य प्राप्त करण्यासाठी कशाप्रकारे अर्ज करावा?**❖संक्षिप्त स्वरुपात तक्रार किंवा सहाय्यता प्राप्त करण्याचे कारण नमूद करुन एक लिखित स्वरुपात अर्ज दाखल करुन :❖ जर अर्जदार अशिक्षित असेल किंवा लिहिण्याच्या स्थितीत नसेल तर, विधी सेवा प्राधिकरण/समिती चे सदस्य सचिव किंवा अधिकारी त्यांचे तोंडी निवेदन नोंदवून घेतील आणि नोंदविलेल्या निवेदनावर त्याची सही/अंगठयाचा ठसा घेतील आणि असे निवेदन अशा व्यक्तीचा अर्ज समजण्यात येईल.❖ अर्जदारास विधी सेवा प्राधिकरण/समितीकडे विनाशुल्क उपलब्ध असलेल्या एका विहित नमुन्यात शपथपत्र निष्पादित करुन द्यावे लागेल, ज्यायोगे अर्जदाराची विधी सहाय्य प्राप्त करण्यासंबंधी निकष तपासून घेता येईल.❖ विधी सेवा प्राधिकरण/समितीचे सदस्य सचिव अर्जदाराची त्याने शपथपत्रामध्ये सांगितलेल्या तथ्यांची पडताळणी करण्यासठी तपासणीसुध्दा करु शकतात. **कोणकोणत्या विषयांसंबंधात कायदेशीर सहाय्य उपलब्ध करुन घेता येणार नाही?**❖ मानहानी❖विद्वेषपूर्ण अभियोग❖ न्यायालयाचा अवमान किंवा खोटी साक्ष देणे या आरोपाखाली कार्यवाही करण्यात येणाऱ्या व्यक्ती,❖कोणत्याही निवडणूकसंबंधी कार्यवाही ❖ आर्थिक गुन्हेसंबंधी आणि सामाजिक कायद्यांच्या विरुद्ध गुन्हें जसे की, अस्पृश्यता किंवा जातीच्या आधारावर किंवा जातीय पूर्वग्रह दुषिततेच्या विरोधातील तक्रारींचा प्रतिवाद करणे. **विधी सेवा प्राधिकरण / समिती खालील व्यक्तींना मोफत विधी सेवा पुरविते -**❖अनुसूचित जाती किंवा जमातीतील व्यक्ती ❖ अवैध मानवी व्यापारातील बळी किंवा भिकारी❖ स्त्रिया अथवा बालके❖ अपंग व्यक्ती म्हणजेच अशा व्यक्ती ज्या अंधत्व, कुष्ठरोग, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यात असमर्थता बहिरेपणा, मानसिक असमर्थता यांनी ग्रस्त आहेत. ❖ सार्वत्रिक आपत्ती, जातीय हिंसाचार, जातीय अत्याचार, पूर दुष्काळी, भूकंप किंवा औद्योगिक आपत्तीचे बळी. ❖ औद्योगिक कामगार.❖ अन्विक्षाधीन, न्यायलयीन कोठडीत असलेल्या व्यक्ती ज्यांमध्ये सुरक्षागृहातील किशोरवयीन अपराधी, म्हणजेच १८ वर्षे पर्यंत वय असलेल्या व्यक्तींचा किंवा मनोरुग्णालयातील अथवा शुश्रूषालयातील मानसिक रुग्ण यांचा समावेश आहे. ❖ वार्षिक उत्पन्न रु. २,००,०००/- पेक्षा कमी असलेल्या व्यक्ती. **विधी सेवा केव्हा परत घेतल्या जाऊ शकतात?**❖जर सहाय्यित व्यक्तिजवळ पुरेशी साधने उपलब्ध असतील तर,❖जर सहाय्यित व्यक्तीने विधी सेवा लबाडीने अथवा कपटाने प्राप्त करुन घेतलेल्या असतील तर,❖जर सहाय्यित व्यक्ती विधी सेवा प्राधिकरण/समिती अथवा विधी सेवा पुरविणारे वकील यांच्याबरोबर सहकार्य करीत नसेल तर,❖ जर त्या व्यक्तिने विधी सेवा प्राधिकरण/समिती यांनी नेमलेल्या विधी व्यवसायी व्यतिरिक्त इतर विधी व्यवसायीची नेमणूक केलेली असेल तर,❖जर सहाय्यित व्यक्तीचा मृत्यू झाला तर, ज्या दिवाणी खटल्यांमध्ये अधिकार किंवा दायित्व टिकून आहेत ते खटले सोडून.❖जर विधी सेवा प्राप्त करुन घेण्यासाठी अर्ज किंवा प्रश्नांकित विषय हे कायदेशीर प्रक्रिया किंवा विधी सेवा यांचा दुरुपयोग आहे असे आढळून आल्यास. **कोणत्या स्वरुपाची विधी सहाय्यता पुरविली जाते?**❖कोणत्याही न्यायालयीन कार्यवाहीशी संबंधित देय किंवा झालेला सर्व खर्च.❖कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीमध्ये मसुदालेखन करणे, दस्तऐवज तयार करणे आणि कायदेशीर कार्यवाहीमध्ये विधी व्यवसायीने प्रतिनिधीत्व करणे यासाठीचा खर्च. कायदेशीर कार्यवाहीमध्ये आदेशांच्या न्यायनिर्णयांच्या प्रती/प्रमाणित प्रती मिळविण्यासाठी लागणारा खर्च व इतर किरकोळ खर्च.❖कायदेशीर कार्यवाहीमध्ये झालेल्या इतर खर्च, उदा. खटल्याचे कागद-पुस्तक तयार करणे (ज्यामध्ये कागद, छपाई आणि कागदपत्रांचे भाषांतर सामील आहे) आणि अनुषांगिक इतर खर्च.

## वरिष्ठ नागरिकांचे अधिकार / उद्दीष्ट

आपल्या देशात वरिष्ठ नागरिकांना सांभाळण्याची जबाबदारी त्यांच्या पाल्यांवर असते. पूर्वी घरात हवे नको ते बघण्याची मुलांची धडपड असायची, परंतू आज परिस्थिती बदललेली आहे. त्यांना वृध्द व्यक्ती घरात असणे हे अडचणीचे वाटते, त्यामुळे त्यांच्या पालनपोषणाची जबाबदारी मुले विसरत चालली आहेत. वरिष्ठ नागरिकांना आर्थिक सहाय्य मिळावे, त्यांचे पालनपोषण नीट व्हावे याबाबत फौजदारी प्रक्रिया संहीतेमध्ये तरतूद केलेली आहे. वरिष्ठ नागरिकांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला आहे, त्याचा विचार करुन सन २००७ मध्ये आई-वडील व वरिष्ठ नागरिकांचे कल्याण व पालणपोषण अधिनियम २००७ (The Maintenance and Welfare of Parents and Senior Citizens Act, 2007) अंमलात आणण्यात आले.

**सदर कायद्यात असलेली तरतूद** : सदर कायद्यानुसार तसेच कलम १२५ फौजदारी प्रक्रिया संहिता यानुसार वरिष्ठांना त्यांच्या मुलाकडून स्वतःचे पालन-पोषण करीता रक्कम पोटगी म्हणून स्वीकारण्याचा कायदेशीर अधिकार आहे, सदर पोटगीची रक्कम सर्वस्वी मुलांचे उत्पनावर अवलंबून असते. त्याचे उत्पन्न व त्याच्या परिवाराचा खर्च हे विचारात घेऊनच न्यायलय पोटगीची रक्कम ठरवित असते. **वरिष्ठ नागरिकांचे कल्याण म्हणजे नेमके काय?** : पोटगी व्यतीरिक्त वरिष्ठ नागरिकांचे आरोग्याची देखभाल, त्यांचे मनोरंजन अथवा मन रमविण्याकरिता केंद्र बनविणे आणि आवश्यक त्या सर्व सोयी पूरविणे यालाच कल्याणाचे कायद्याचे काम म्हटले जाते. **जर कुणी आई, वडील अगर ज्येष्ठ नागरिक समर्थ नसेल तर अर्ज कोण करु शकते.** : अश्या परिस्थितीत त्याने ज्याला अधिकार दिला ती व्यक्ती अर्ज करु शकते किंवा कुठलीही संघटना अर्ज करु शकते किंवा पोटगी अधिनियमाची माहीती मिळाल्यानंतर स्वतः देखील कार्यवाही करु शकते. **जर मुलगा किंवा नातेवाईकाने पालन-पोषणाची ठरवून दिलेली रक्कम अदा केली नाही तर काय?** : अशा परिस्थितीत न्यायाधिकरण आपले आदेशावर अंमल करण्यासाठी स्वतः फौजदारी न्यायालयाचे अधिकाराचा वापर करेल. **वृध्दांसाठी काही कल्याणाचा योजना** : निराधार राहणाऱ्या वृद्धांकरीता प्रत्येक जिल्ह्यात एक वृध्दाश्रम बनणार आहे. त्या ठिकाणी मनोरंजनाची व्यवस्था असेल. त्यामुळे ते तेथे प्रसन्न राहू शकतील, त्या ठिकाणी त्यांच्या आरोग्याची देखभाल करण्यासाठी देखील आवश्यक ती व्यवस्था असेल. **सदर कायद्यानुसार कोणती कार्यवाही होऊ शकते?** : आई-वडील अगर वरिष्ठ नागरिकांचे कल्याण व पालन पोषण अधिनियम २००७ चे कलम २४ नुसार मुले किंवा नातेवाईकांनी आई-वडील अगर वरिष्ठ नागरिकांची देखभाल अगर संरक्षण करणे सोडून दिले आणि त्यांचेपासुन सुटका मिळावी म्हणून त्यांना कुठेतरी सोडून दिले तर अशी मुले किंवा नातेवाईकांना तीन महिन्यांपर्यंतची तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. तसेच तुरुंगवासाची शिक्षा किंवा रुपये ५०००/- पर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकते.

## मानसिक आरोग्य कायदा १९८७

प्रत्येक मानसिक आजार हा गंभीर मनोविकार नसतो. प्रत्येक मानसिक रोगी हा वेडा नसतो. आपल्या समाजात सर्व प्रकारचे लोक राहतात, त्यामध्ये मनोरुग्ण देखील असतात. कुटूंबिय व समाजाकडून त्यांबाबत होणारा भेदभाव दूर करण्यासाठी सरकारने मानसिक आरोग्य कायदा १९८७ लागू केलेला आहे. त्या कायद्याने मनोरुग्णांचे अधिकार, कायदेशीर सुरक्षा व उपचार पध्दती व सुविधा कशा असाव्यात ते सांगितले गेले आहे. **भारत सरकार व राज्य सरकारने यांचे करीता कोणत्या सुवधिा पूरविल्या आहेत?** ❖ भारत सरकार देशात कुठेही मनोरुग्णाचे उपचारासाठी दवाखाने आणि नर्सिंग होम उघडू शकते, यामध्ये मानसिक आजाराने ग्रस्त लोकांना भरती केले जाते व त्यांचेवर उपचार व उत्तम देखभाल केली जाते. ❖ १६ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मनोरुग्णासाठी वेगळी इस्पितळे उघडली जातात. ❖ दारु आणि नशिले पदार्थ सेवन करणाऱ्या मनोरुग्णाकरीता आणि कुठल्याही अपराधसिध्द दोषी मनोरुग्णासाठी वेगळी मनोरुग्ण इस्पितळे व नर्सिंग होम्स उघडली जातात. **गहण आदेश (Reception Order) मिळण्यासाठी अर्ज कोठे करावा लागतो.** ❖ जर मनोरुग्णाची स्थिती चिंताजनक असेल तर कधी कधी त्याला ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी इस्पितलात दाखल ठेवावे लागते. अशा रुग्णाकरीता पती-पत्नी किंवा त्यांचा कुणीही

नातेवाईक अर्ज करु शकतो, तो अर्ज मॅजिस्ट्रेटकडे करावा लागतो. **मनोरुग्णासंदर्भात पोलिसांची जबाबदारी काय असते?** ❖ मानसिक दृष्ट्या आजारी व्यक्ती जर बाहेर फिरताना आपली स्वतःची देखभाल करु शकत नसेल तर पोलिस ठाण्याचा अधिकारी त्याला आपल्या सुरक्षीतेखाली घेईल. ❖ मानसिक रोगी जर दुसऱ्या लोकांकरीता धोकादायक होऊ शकत असेल तर त्याला पोलिस अधिकारी ताब्यात घेईल. ❖ अशा मनोरुग्ण संदर्भात पोलिस अधिकारी त्याचे नातेवाईक व मित्रांना कळवेल. ❖ अशा मनोरुग्णास २४ तासाचे आत दंडाधिकाऱ्यासमोर हजर करावे लागते. दंडाधिकाऱ्याच्या आदेशावरुन त्याला कोठडीत ठेवता येणार नाही. **मनोरुग्णाला मानवाधिकार असतात का?**

❖ होय, मनोरुग्णास उपचारा दरम्यान त्याची शारीरीक किंवा मानसिक छळवणूक करता येत नाही. ❖ इलाजादरम्यान त्यांचे हिताचे नसलेले कुठलेही प्रयोग त्यांच्यावर करता येत नाहीत.

**महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई**, १०५, उच्च न्यायलय (पी.डब्ल्यू.डी.) इमारत, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२. वेबसाईट : legalservices.maharashtra.gov.in ई-मेल : mslsa-bhc@nic.in फोन : (०२२) २२६९१३९५/ २२६६५८६६ / (०२२) २२६९१३५८ फॅक्स : (०२२) २२६७४२९५

---

# पुण्याची गणना करु नका

- **डॉ. लक्ष्मीकांत दाणी**, मो. ९८२०४ ३७०७३
email : laxmikant1411@yahoo.com

सकाळी पंधरा मिनिटे पूजा करून टाकतात आणि दिवसभर मौजमजा. संचितातले पुण्य भसाभस संपत जाते.काही पापही हातून घडत असते. पण मनात सतत अहंकार असतो की मी सकाळी पूजा केली आहे. महान तपश्चर्या केलेल्या कालीभक्त परमहंसांना कॅन्सर झाला. विवेकानंदांना मधुमेहाने ग्रासले. महान संत गुलाबराव महाराजांना अंधत्व आले. सुरदासही आंधळे होते. मुक्तेश्वर मुके होते. कुर्मदास पांगळे होते. जन्मभर श्रीकृष्णांसाठी वेड्या झालेल्या मीराबाईला खूप छळ सोसून शेवटी विषाचा प्याला घ्यावा लागला. पांचालीला वस्त्रहरणाच्या दिव्यातून जावे लागले. महान पतिव्रता सीतादेवींना बंधनवासात रहावे लागले आणि अग्निदिव्याला सामोरे जावे लागले. श्री. रामप्रभूंना वनवास भोगावा लागला. प्रत्यक्ष श्रीकृष्णांना स्यमंतक मणी चोरल्याचा आरोप सहन करावा लागला. विश्वमित्रांची तपश्चर्या भंग पावली. ह्या महान पुण्यवान जीवांना दुःख भोगावे लागले इतकी कर्माची गति गहन असते तर पैशाची टांकसाळ घरात असताना आपल्या टिचभर पुण्याचा डांगोरा पिटणे हास्यास्पद नाही का ? "मी एवढे देवाचे करतो तरी माझ्याच वाट्याला दुःख का" असे रडगाणे गाणाऱ्या अज्ञ जीवांनी वरील उदाहरणे वाचून निमुटपणे प्रेमाने उपासना करीत रहावे व परमेश्वराच्या अचुक न्यायदानावर विश्वास ठेवावा. त्याच्या न्यायालयात कधीही गफलत होत नाही. हरि मुखे म्हणा ! हरि मुखे म्हणा ! पुण्याची गणना कोण करी ! म्हणून पुण्याची गणना करु नका....

**गायत्री मंत्र सर्वाक्षर महिमा:** ▸ "ॐ" या अक्षराचा उच्चार केला असता मस्तकातील भाग प्रभावित होतो. ▸ "भूः" या अक्षराच्या उच्चाराने उजव्या डोळ्यावरील चार बोटांचा कपाळाचा भाग जागृत होतो. ▸ "भूवः" च्या उच्चारणाने मानवाच्या भृकुटीच्या वरील तीन अंगुलीचा भाग प्रभावित होतो. ▸ "स्वः" या अक्षराच्या उच्चाराने डाव्या डोळ्यावरील कपाळाचा चारअंगुली इतका भाग जागृत होतो. ▸ "तत्" च्या उच्चाराने आज्ञा चक्रामध्ये असलेली 'तापिनी' ग्रंथीतील सूप्त असलेली 'साफल्य' शक्ति जागृत होते. ▸ "स" च्या उच्चाराने डाव्या डोळ्यातील सफलता नावाच्या ग्रंथीमध्ये सुप्त रुपाने असलेली 'पराक्रम' शक्ति प्रभावित होते. ▸ "वि" चे उच्चारण केले असता डाव्या डोळ्यामधील 'विश्व' ग्रंथीमध्ये स्थित असलेली 'पालन' शक्ति जागृत होते. ▸ "तु" या अक्षराच्या उच्चारणाने डाव्या कानात असलेल्या 'तुष्टी' नावाच्या ग्रंथीतील 'मंगळकर' शक्ति प्रभावित होते. ▸ "र्व" या अक्षराच्या उच्चाराने उजव्या कानात स्थित असलेल्या 'वरदा' ग्रंथीतील 'योग' नावाची शक्ति सिध्द होते. ▸ "रे" चा उच्चार केला असता नासिकेच्या मुळाशी स्थित असलेल्या 'रेवती' ग्रंथीतील 'प्रेम' शक्तिची जागृती होते. ▸ "णि" च्या उच्चाराने वरील ओठांवर असलेल्या 'सूक्ष्म' ग्रंथीतील सुप्त शक्ति 'धन' संध्य जागृत होते. ▸ "यं" या अक्षराच्या उच्चाराने आपल्या खालच्या ओठावर असलेल्या 'ज्ञान' ग्रंथीतील 'तेज' शक्तीची सिध्दि होते. ▸ "भर" या अक्षर

समुदायाच्या उच्चारणाने कंठात असलेल्या 'भग' ग्रंथीतील' रक्षणा' शक्ति जागृत होते. ▶ "गो" चा उच्चार केला असता कंठ कूपात स्थित असलेल्या 'गोमती' नावाच्या ग्रंथीतील 'बुध्दि' शक्तीची सिध्दि होते. ▶ "दे" च्या उच्चाराने डाव्या छातीच्या वरच्या भागात असलेल्या 'देविका' ग्रंथीतील 'दमन' शक्ति प्रभावित होते. ▶ "व" चा उच्चार उजव्या छातीच्या वरच्या भागात असलेल्या 'वराही' ग्रंथीतील 'निष्ठा' शक्तीची सिध्दि करतो. ▶ "स्य" याच्या उच्चारणाने पोटाच्या वरील बाजूस (ज्या ठिकाणी बरगड्या जुळतात) 'सिंहिणी' नावाची ग्रंथी असते. या ग्रंथीतील "धारणा' शक्ति प्रभावित होते. ▶ "धी" च्या उच्चारणाने यकृतात असलेल्या 'ध्यान' ग्रंथीतील 'प्राणशक्ति' सिध्द होते. ▶ "म" या अक्षराच्या उच्चाराने आपल्या प्लिहा मध्ये असलेल्या 'मर्यादा' ग्रंथीतील 'संयम' शक्तिची जागृती होते. ▶ "हि" च्या उच्चाराने नाभीमधील 'स्फुट' ग्रंथीतील 'तपो' शक्ति सिध्द होते. ▶ "धी" या अक्षराच्या उच्चारणाने पाठीच्या मागील कण्याच्या खालील भागात असलेल्या 'मेघा' ग्रंथीतील 'दूरदर्शिता' शक्तीची सिध्दि होते. ▶ "यो" च्या उच्चारणाने डाव्या भूजेत स्थित असलेल्या 'योगमाया' ग्रंथीतील 'अंतर्निहित' शक्ति जागृत होते. ▶ "यो" च्या उच्चारणाने उजव्या भुजेमध्ये स्थित असलेल्या 'योगिनी' ग्रंथीतील' उत्पादन' शक्ति जागृत होते. ▶ "नः" या अक्षराच्या उच्चारणांने उजव्या कोपरामध्ये असलेल्या 'धारिणी' ग्रंथीतील 'सरसता' शक्तीची सिध्दि होते. ▶ "प्र" या अक्षराच्या उच्चारणाने डाव्या कोपरात असलेल्या 'प्रभव' ग्रंथीतील 'आदर्श' नावाच्या शक्तीची जागृती होते. ▶ "चो" या अक्षराच्या उच्चारणाने उजव्या मनगटात असलेल्या 'उष्मा' ग्रंथीतील 'साहस' शक्तीची सिध्दि होते. ▶ "द" या अक्षराच्या उच्चारणाने उजव्या तळहातावर असलेल्या 'दृश्य' नावाच्या ग्रंथीतील 'विवेक' शक्तीची जागृती होते. ▶ "यात्" या अक्षर दवयांच्या उच्चारणाने डाव्या तळहातावरील 'निरंजन' ग्रंथीतील 'सेवा' शक्ति सिध्द होते. **जय भगवती !....**

**सुविचार :** • जिंकल्यावर शाबासकी देणाऱ्या हाताच्या गर्दीपेक्षा, खेळात उतरायच्या आधी विश्वासाने पाठीवर ठेवलेले काही हात खुप किंमती असतात. • असं म्हणतात की काळजी करणारी माणसं मिळायला भाग्य लागतं. पण अशी माणसे आपल्याला मिळाली आहेत हे समजायला जास्त भाग्य लागतं. • तरुणपणी वाढदिवस आणि म्हातारपणी काढ दिवस हे आजचं समिकरण आहे... आयुष्य मनसोक्त जगून घ्या.रात्री फुलांना सुध्दा माहिती नसतं की सकाळी मंदिरात जायचं की स्मशानात... • धडा तर लहान मुलांकडून घेतला पाहिजे...जे आपलाच मार खाऊन परत आपल्यालाच बिलगतात... नाती जपत चला कारण... आज माणूस एवढा एकटा पडलाय की... कुणी फोटो काढणारा पण नाही... सेल्फी काढावी लागते... ज्याला लोक फॅशन समजतात. • माचीसच्या काडीला डोकं असतं पण मेंदू नसतो, म्हणून थोड्या घर्षणाने ती पेटून उठते... आणि स्वतःच जळते... परंतु आपल्याजवळ तर डोकं आहे आणि मेंदू सुध्दा आहे... मग आपण लहान सहान गोष्टीने पेटून उठतो... शांत रहा... स्वस्थ रहा... घर्षण करून पेटविणाऱ्यांपासून सावध रहा... आपण जगण्यासाठी आहोत. जळण्यासाठी नाही...जीवन खुप सुंदर आहे ते आनंदाने जगा. • आपुलकीच्या नात्याला कधी दुरावा माहित नसतो, कारण... कव्हरेज क्षेत्राच्या पलिकडे देखील मनाचा संपर्क असतो. • एवाद्याच्या भल्यासाठी तुम्ही चंदनासारखे आवश्य झिजा... फक्त एवढी काळजी घ्या की... समोरच्या व्यक्तीने तुम्हाला जळाऊ लाकूड समजू नये... • जीवनांत काहीतरी मागण्यापेक्षा काहीतरी देण्यात महत्व असतं... कारण मागितलेला स्वार्थ, अन दिलेलं प्रेम असतं... • डोळ्यातुन वाहणारं पाणी, कोणीतरी पाहणारं असावं, ह्रदयातुन येणारं दुःख कोणीतरी जाणणार असावं, मनातून येणाऱ्या आठवणी, कोणीतरी समजणारं असावं, जीवनात सुख-दुःखात साथ देणारं, एक सुंदर नातं असावं. • दररोज कुणाच्या तरी आनंदाचे कारण बना... बघा तुम्हाला मिळणारा आनंद हा तुम्ही दिलेल्या आनंदापेक्षा जास्त असेल.

---

# बडोदे संस्थेत कोजागिरी

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ बडोदे यांचा कोजागिरी पौर्णिमेचा कार्यक्रम रविवार दिनांक २०-१०-१९ च्या रोजी सायंकाळी सहा वाजता अलकापुरी येथील बरोडा हाईस्कुल नाटकगृहात मंडळाचे उत्साही विश्वस्त श्री अरुण दिंडोरकर व कार्यकर्ते श्री संतोष करंजगांवकर यांच्या नेतृत्वांत संपन्न झाला. तसेच बडोद्यातिल कलाकारांद्वारे स्व. पु. ल. देशपांडे लिखित 'असा मी असामी' नाटकाचे दोन प्रवेशाचे सादरीकरण करण्यात आले. उपस्थितीतांची खूप दाद मिळाली व अभिनंदनाचा वर्षाव झाला. मंडळाने असेच उपक्रम राबवावे अश्या शुभेच्छा उपस्थिताकडून येत होत्या. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली व शेवटी चंद्राच्या चांदण्यात सर्व मंडळींनी पाव भाजी व दूध पोह्यांचा अस्वाद घेतला. वरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यकारिणीने परिश्रम घेतले. मुकुंद काळुस्कर, अध्यक्ष.

# ठाणे संघाची आगळीवेगळी भाऊबीज



ज्या समाजांत आपण राहतो त्या समाजाचे आपण काही देणे लागतो या जाणिवेतून ठाणे संस्थेचे उपाध्यक्ष श्री मिलिंद सरदेशमुख व सहकारी, संस्थेचे अध्यक्ष श्री विलास जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली गेली सात वर्षे न चुकता ठाण्याच्या वर्तक नगर येथील शास्त्रीनगर नाक्यावर नाका कामगार बंधू-भगिनींसाठी न चुकता भाऊबीज कार्यक्रम साजरा करत आहेत. ठाण्यातील शास्त्रीनगर नाक्यावर शेकड्याने पुरुष आणि महिला रोजगाराच्या शोधात उभे असतात. बांधकामाच्या ठिकाणी रोजगार मिळवण्यासाठी दररोज सकाळी असणारी गर्दी पोटाची खळगी भरण्यासाठी झोपडपट्टीतून काम शोधत आलेली गोरगरीब जनता म्हणजेच नाका कामगार! त्यांना कुठलेच सणवार नाहीत अथवा उत्सव नाहीत. ऐन दिवाळीत काम शोधण्यासाठी नाक्यावर उभ्या असणाऱ्या या कामगारांना दिवाळीचा थोडा तरी आनंद घेता यावा म्हणून ठाणे संस्थेतर्फे भगिनींना ब्लाउज पीस आणि दिवाळी फराळ वाटला जातो. जवळपास अडीचशे तीनशे महिला व शंभर-दीडशे पुरुष या उपक्रमात सहभागी होत असतात. खरं तर अशिक्षित कामगार पण ते शिक्षितांनाही लाजवतील अशा शिस्तबद्ध पद्धतीने रांगा लावून दिलेल्या भेटवस्तू आनंदाने स्वीकारत असतात. यंदा माननीय श्री विलास जोशी मध्यवर्ती आणि ठाणे संस्थेचे अध्यक्ष ठाणे भूषण तसेच थोर समाजसेवक श्री विलास जोशी तसेच माननीय जयंत करंजवकर ज्येष्ठ पत्रकार यांच्या हस्ते दिवाळी भेट वस्तूंचे वाटप करण्यात आले. माननीय विलासराव जोशी यांनी या भाऊबीजे निमित्त करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची उपस्थितांना थोडक्यांत माहिती दिली. नाका कामगारांच्या चेहऱ्यावरचा आनंद खूप काही सांगून गेला. श्री समर्थ रामदास स्वामींची रचना काही अशा पद्धतीने म्हणाविशी वाटते आपल्याकडे आहे ते इतरांशी द्यावे आनंदी करून सोडावे सकळजन! सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सौ. माधवी सरदेशमूख, सौ रोहिणी जोशी, सौ. शर्मिला ठकार, समाज मित्र श्री बकशेट्टी, कविता ठोंबरे, जितेंद्र सगणे समर्थ बकशेट्टी ह्यांनी खूप परीश्रम घेतले.

पुढील वर्षी आपल्याला सहभागी व्हायचे असल्यास आपल्या तर्फे फुल ना फुलाची पाकळी जर द्यावयाची असेल तर आपण जरूर पुढे यावं म्हणजे आपणास अधिकाधिक लोकांपर्यंत मदत पोहोचविली येईल. असं जर काही झालं तर ही माहिती आपल्यापर्यंत पाठवण्याचा उद्देश सफल होईल.





# दिवाळी निमित्त सप्तसुरांची मेजवानी

दिनांक २६.१०.२०१९ रोजी अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळातर्फे दिपावली निमित्त सप्तसुरांची मेजवानी जुन्या नव्या हिंदी, मराठी गाण्याचा कार्यक्रम राष्ट्रीय किर्तीची गायीका व सारेगम फेम प्रसिद्ध गायीका सौ. धनश्री देशपांडे व सूर नवा ध्यास नवा फेम गायक श्री. जयदीप बगवाडकर यांनी सादर केला. सकाळी ८.०० वाजता सुरु झालेल्या कार्यक्रमाची सांगता ११.०० वाजता झाली. या कार्यक्रमांत दादर, विलेपार्ले, गिरगाव, मुलूंड, ठाणे, कल्याण, डोंबिवली स्थित मंडळाच्या सभासदांनी सुरेख संगिताचा आनंद लुटला व कार्यक्रम अप्रतिम झाल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

वरील कार्यक्रमात "राम समर्थ" या रामदास स्वामी यांच्या जीवनावर आधारीत पहिल्या चित्रपटाचे दिग्दर्शक श्रीयुत. संतोष तोडणकर यांची उपस्थिती लाभली होती. समर्थ रामदास स्वामीच्या जीवनाचे महत्व विशद करताना सर्व उपस्थितांना हा चित्रपट प्रेक्षागृहांत जाऊन अवश्य पाहण्याचे आवाहन केले. याला सर्व उपस्थितांनी प्रतिसाद दिला.

श्रीयुत. संतोष तोडणकर यांचा संस्थेतर्फे यथोचित शाल श्रीफळ स्मृती चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. सर्व समाज बांधवानी हा चित्रपट पाहावा असे आवाहन करण्यात आले.

या कार्यक्रमा अंतर्गत कार्यकारी मंडळाचे सन्माननीय सदस्य व महाराष्ट्र राज्य कर्मचारी व अधिकारी वर्गाचे प्रमुख नेते श्री. मिलिंदजी सरदेशमुख यांचा त्यांना मिळालेल्या राजपत्री अधिकारी या नेमणूकीबद्दल संस्थेतर्फे सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमानंतर सर्व उपस्थितांनी दिपावलीच्या सुग्रास फराळाचा आनंद घेतला व तृप्त होऊन संस्थेला या कार्यक्रमाच्या नियोजनाबद्दल धन्यवाद दिले. या कार्यक्रमाची क्षणचित्रे खाली दिली आहेत.

सर्व दे.ऋ.ब्रा. सभासद बंधू भगिनींना आवाहन "राम समर्थ" हा चित्रपट प्रेक्षागृहांत जाऊन बघवा. आपले आद्यगुरु समर्थ रामदास स्वामी यांच्या जीवनासंबंधी माहिती त्यांना कळेल.






# नाशिक संस्थेत श्री दुर्गादेवी नवरात्रोत्सव थाटात संपन्न

नाशिक येथे संस्थेचा प्रतिवार्षिक नवरात्रोत्सव आनंदी व उत्साही वातावरणांत संपन्न झाला. दि.२१ सप्टेंबर रोजी कार्यकारी सदस्य श्री दिगंबर शंकर कुलकर्णी यांच्या हस्ते घटस्थापना करण्यात आली. नवरात्रोत्सवात रोज सकाळी संस्थेच्या कार्यकर्त्यांतर्फे श्री देवीस अभिषेक व सायंकाळी युवतींतर्फे श्री दुर्गादेवीची आरती व पुजा वेदमूर्ती पांडुरंगशास्त्री पैठणकर यांच्या पौराहित्याखाली भक्तीरसपूर्ण वातावरणात संपन्न होत असे. रोज अभिषेक व आरतीसाठी दिगंबर कुलकर्णी,राजन दशपुत्रे,अवधूत देशपांडे, प्रशांत पाटील, अनंत दशपुत्रे, निश्चल घाटपांडे, ओंकार तारे, सुनील नांदुर्डीकर, विनायक एडगावकर, वेदश्री कुलकर्णी, संदीप गोसावी, वृंदा पुंडलिक, अजय चौधरी, किशोर हिंगणे, सिद्धी कुलकर्णी, प्रशांत कुलकर्णी, अध्यक्ष मुकुंदराव कुलकर्णी, कार्याध्यक्ष सुहास पाटील, कार्यवाह नरेंद्र कुलकर्णी, खजिनदार मकरंद सुखात्मे, व.य.कुलकर्णी, मंदार तगारे, संदीप गोसावी, सचिन निरंतर, राजेंद्र हातवळणे, प्रशांत निरंतर, अशोक कुलकर्णी महिला शाखेच्या सौ.अनघा धोडपकर, सौ.सविता कुलकर्णी, श्रीमती सुचेता देवरे, अमिता कुलकर्णी, सौ. मृण्मयी सुखात्मे, सौ संगीता कुलकर्णी यांची उपस्थिती असायची. संस्थेच्या महिला शाखेच्या वतीने रोज सायंकाळी शहरातील विविध महिला मंडळाच्या भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कर्यक्रमास भाविकांचा विशेषतः महिलांचा उदंड प्रतिसाद मिळाला. ललिता पंचमीनिमित्त महिला शाखेच्या वतीने प्राकृत देवी महात्म्याचे सामुहिक पारायण आयोजित करण्यात आले होते.सकाळी ८.३० ते १२.३० पर्यंत चाललेल्या या पारायणांत महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. महिला शाखेतर्फे महिलांसाठी भोंडल्याचा कार्यक्रम संपन्न झाला. तसेच दि.०४/१०/२०१९ रोजी दुपारी गीता फाउंडेशन मिरजचे आदरणीय श्री दिलीपकाका ह्यांच्या मार्गदर्शनानुसार विष्णुसहस्त्रनाम पठणाचा कार्यक्रम संपन्न झाला. रविवार दि. ६ ऑक्टोबर रोजी अष्टमीच्या दिवशी सी.ए.श्री.प्रशांत रा.कुलकर्णी व सौ.प्रिती प्र.कुलकर्णी यांच्या हस्ते सप्तशतीचे पूजन, होमहवन झाले. दुपारी १२ वाजता सुरु झालेल्या या कार्यक्रमाची पूर्णाहुती सायंकाळी ६ वाजता वेदमूर्ती पांडुरंगशास्त्री, वासुदेवशास्त्री व मनीष पैठणकर आणि सहकारी ब्रह्मवृन्दांच्या पौराहित्याखाली संपन्न झाली. तसेच महिला शाखेच्या वतीने ब्राह्मण महिला लघु उद्योजीका व लघु व्यावसायीकांमार्फत भव्य प्रदर्शन संस्थेच्या कै.गो.ह.देशपांडे सभागृहात संपन्न झाले. त्याचे उद्घाटन मध्यवर्ती मंडळाचे कार्याध्यक्ष श्री प्रभाकर कुलकर्णी व संस्थेचे अध्यक्ष श्री मुकुंदराव कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. ३० महिलांनी यामध्ये सहभाग नोंदविला. मेळावा यशस्वी करण्यासाठी महिला शाखा कार्यवाह सौ सविता कुलकर्णी, कार्याध्यक्षा सौ अनघा धोडपकर, श्रीमती सुचेता देवरे, अमिता कुलकर्णी तसेच सौ संस्कृती कुळकर्णी यांनी परिश्रम घेतले. यानंतर रात्री १० वाजेपर्यंत संस्थेच्या सभासद बांधवांनी व अन्य भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन श्रीदुर्गादेवीच्या दर्शनाचा व प्रसादाचा लाभ घेतला. यात प्रामुख्याने प्रदेश महाराष्ट्र भा.ज.पा. सरचिटणीस श्री लक्ष्मण सावजी, आमदार सौ देवयानी फरांदे, नगरसेविका सौ भोसले, श्री समर्थ सहकारी बँकेचे संचालक श्री बाळासाहेब कुलकर्णी, ॲड श्री जालिंदर ताडगे, श्रीपाद कुलकर्णी, उपाध्यक्षा सौ अलकाताई कुलकर्णी, श्री मालपाठक, रत्नपारखी, डॉ.श्री व सौ वाडीकर, श्री व सौ सतीश करंजगीकर, श्री बिपीनभाई ठक्कर, प्रशांत पाटील, मध्यवर्ती मंडळाचे कार्याध्यक्ष श्री प्रभाकर कुलकर्णी, श्री माने, व त्यांचे सहकारी आदी मान्यवर उपस्थित होते. सप्तशतीच्या होमहवनासाठी होमकुंड तयार करण्यासाठी कार्याध्यक्ष श्री सुहास पाटील, राजेंद्र हातवळणे, कार्यवाह श्री नरेंद्र कुलकर्णी, श्री पांडुरंग पैठणकर यांनी विशेष परिश्रम घेतले. तर संपूर्ण नवरात्रोत्सव यशस्वी करण्यासाठी श्री सचिन निरंतर, प्रभाकर दशपुत्रे, हेमंत कुलकर्णी, मोहिनीराज कुलकर्णी, विकास कुलकर्णी, अतुल कुलकर्णी, अवधूत देशपांडे, वंदना तारे, सारिका चौधरी, नेहा देशपांडे, विजया म्हैसपूरकर, मंजिरी रेडगावकर यांनी प्रयत्न केले.

---

**नवीन सभासद ऑक्टोबर २०१९ :** १. श्री. लक्ष्मीकांत प्रभाकर कुमठेकर, मंगळवेढा, सोलापूर २. सौ. शुभांगी लक्ष्मीकांत कुमठेकर, मंगळवेढा-सोलापूर ३. श्री. केदार प्रमोद जोशी, सांगली ४. श्री. गजानन मधुकर कुलकर्णी, सांगली ५. श्रीमती. शततारका राजेंद्र ठोसर, पाषाण - पुणे ६. श्री. राजेंद्र दत्तात्रय ठोसर, पाषाण-पुणे ७. श्री. सतीश गोविंद फडणीस, अकोला ८. श्री. अभय सुधाकरराव कुळकर्णी, अकोला ९. श्री. संजय त्रबंकराव खडक्कार, अकोला १०. श्री. उमेश गोपाळराव पैठणकर, अकोला ११. श्री. संजय विनायकराव सकळकळे, अकोला १२. श्री. कपिल शशिकांत कुलकर्णी, वडोदरा

## "विठ्ठल नामाचे रे टाहो" कोथरुड संस्थेमध्ये बहारदार कार्यक्रम - श्रीराम कुलकर्णी

बुधवार दि. २३ ऑक्टोबर २०१९ रोजी मनोहर मंगल कार्यालयातील दीपावली पूर्व संध्या कार्यक्रमात रसिक प्रेक्षकांनी आनंदाची लयलूट केली. "विठ्ठल नामाचा रे टाहो - विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल" या अभंगाने मा. श्री. अविनाश सलगरकर व त्यांचे साथीदार या सर्वांनी या भक्तीमय कार्यक्रमाचा अवघा गजर केला, "देवाचिये द्वारी", "आबिर गुलाल, कबिराचे विणतो शेले", माझी रेणुका माऊली, बगळ्यांची माळ, शंभो शंकरा, बाई माझी करंगळी मोडली या अविट गाण्यांची ओवलेली माळ यातील एक एक मणी श्री. अविनाश सलगरकर शीला देव, ऐश्वरी देशमुख, मोनिका धोपेश्वरकर यांनी अगदी तल्लीन होऊन गाणी गाईली व ह्या मण्यांची सुरेख माळ सलगरकर संवादिनी, हळबे मृदुंग, नाडगोडा तबला यांनी ओवली. निमित्त होते देशस्थ ऋग्वेदी वधू-वर ग्रुप कोथरुड यांच्या "जोडी तुझी माझी" ह्या वधू-वर अंकाचे प्रकाशन व दीपावली पूर्वसंध्या. मा. विद्यमान नगरसेविका सौ. मंजूश्री खर्डेकर सामाजिक व धडाडीचे कार्यकर्ते श्री. संदिप खर्डेकर शिवसेना तसेच लोकप्रिय सामाजिक कार्यकर्ते श्री. शाम देशपांडे, भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्ररत्न पुरस्कार विजेत श्री. अविनाश हळबे, ह.भ.प. नरहरी अपामार्जने ह्या सर्वांच्या हस्ते "जोडी तुझी माझी" या वधु-वर दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन दिमाखात पार पडले. याचवेळी नारायणी नमोस्तुते कथासंग्रह लिहिणारे लेखक आपल्या भेटीला ह्या उपक्रमाद्वारे अवघा महाराष्ट्र गाजवणारे श्री. अविनाश हळबे यांना भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्ररत्न पुरस्कार जाहीर झाला त्याबद्दल त्यांचा सत्कार केला. सौ. मंजुश्री खर्डेकर यांनी "जीवनात ही घडी अशीच राहु दे" तर शाम देशपांडे यांनी "आलो मी हितगुज कराया जाऊ नको रे पळ भर" ही गाणी गाऊन राजकारणी असलो तरी रसिक दर्दी आहोत हे दाखवून दिले. देशस्थ ऋग्वेदी संघाचे श्रीराम कुलकर्णी यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन केले त्यांना डॉ. अरुण हुपरीकर व सर्व कार्यकारी मंडळ यांचे सहकार्य लाभले. या अंकामधे एकूण १५०० मुले व १००० मुलींची स्थळे आहेत. या अंकाची किंमत रु. ३००/- आहे.

---

## समर्थभक्त मारुतीबुवा रामदासी यांचे दुःखद निधन

समर्थभक्त मारुतीबुवा रामदासी यांचे १९ अक्टोंबर रोजी निधन झाले. हे कळवण्यास विलक्षण खेद होत आहे. समर्थ भक्तांचा परंपरेने आलेला वारसा सज्जनगडावर आहे. पण ठाराविक धार्मिक उपक्रम सोडल्यास सर्व समाजाला कवेत घेणारा कोणताही उपक्रम केला जात नाही. ही कोंडी समर्थभक्त मारुतीबुवा रामदासी यांनी समर्थपणे फोडली व समर्थ पादुकांचे गांवोगांव पूजन करुन, त्या सर्वांना दर्शनासाठी उपलब्ध करुन देवून, त्याच वेळी समर्थांच्या संदर्भात प्रवचने करुन, असे सप्ताह साजरे करुन समाजांत समर्थकार्याची जागृती केली. हे काम त्यांनी एकट्याने अनेक वर्षे एक हाती केले. येवढ्यावर न थांबता मनाचे श्लोकांचे विवरण दूरदर्शनवर कित्येक आठवडे केले. त्या उपक्रमाला अनेकांनी भरभरुन दाद दिली. एव्हढेच नवे तर समर्थ साहित्यावर अनेक ग्रंथ लिहले, प्रकाशीत केले व त्याचे वितरण केले. हे आर्थिक संकट ओढवून घेणारे काम त्यांनी यशस्विपणे पेलले व एकहाती समर्थ साहित्याचा प्रचार करुन संपूर्ण जीवन व्यतीत केले, समर्थांना समर्पीत केले. याला तोड नाही. अशा समर्थ भक्ताला त्याच्या कार्यात आपल्या देशस्थ ब्राह्मणांनी ठिकठीकाणी योग्य तो प्रतिसाद दिला. व त्यांचा योग्य तो सत्कार केला. त्यामुळे त्यांच्या निधनाने एकूणच देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाला अतीव दुःख होणे स्वाभाविक आहे. मध्यवर्ती मंडळ व सर्व संलग्न संस्था व एकूण देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण त्यांच्या निधनाने पोरका झाला आहे. त्यांना सद्‌गती मिळणारच! त्यांचे कार्याचे स्मरण नित्य करीत राहणे हेच आपल्या हाती आहे. त्यांना सर्वांचे वतीने श्रद्धांजली अर्पण!

---

## कोजागिरी उत्सव

दिनांक १३ ऑक्टोबर २०१९ रोजी दे. ऋ. ब्रा. संघ, विलेपार्ले संस्थेतर्फे कोजागिरी उत्सव साजरा करण्यात आला. या निमित्ताने धनश्री देशपांडे सारेगम फेम व गौरव महाराष्ट्र फेम प्रसिद्ध गायीका व श्री. जयदीप बगवाडकर सूर नवा ध्यास नवा फेम यांच्या हिंदी मराठी जुन्या गाण्याचा अतीशय बहारदार कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी संस्थेचे सभागृह पूर्ण भरले होते. सभासदांनी कार्यक्रमास उत्तम प्रतिसाद देऊन वरचे वर असेच कार्यक्रम व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमानंतर सुग्रास जेवण व मसाले दूध देण्यात आले. आलेल्या सर्व सभासदांनी सुग्रास जेवणाचा लाभ घेतला.

## श्री. मिलींद सरदेशमूख यांचा ठाण्यातील भाऊबीज नाका! - **जयंत करंजवकर**, ज्येष्ठ पत्रकार

नुकतीच दिवाळी झाली. हजारो महिला व पुरुष काम मिळण्यासाठी शास्त्री नगर नाक्यावर भर दिवाळींत उभे असतात. हा मनाला न पटणारा प्रसंग आणि १९ लाख सरकारी कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी मिलिंद सरदेशमुख यांच्या नजरेत आला तो पाच वर्षांपूर्वी आणि तोही भाऊबीजेच्या दिवशी. 'दिवाळी सण, आनंदाला नाही तोटा' हा वाक्प्रचार या नाका कामगारांना लागू पडत नाही. हा विरोधाभास प्रसंग त्यांना व त्यांच्या सेवाभावी मित्रांचे मन काही स्वस्थ बसू देईना. अर्ध पोटी राहणाऱ्या ह्या महिला कामगारांना भाऊबीजेच्या दिवशी ब्लाऊज पीस व दिवाळीचा फराळ द्यायचा, हा विचार प्रत्यक्षात आचरणात आणण्याचा निर्णय घेऊन प्रथम दहा सदस्यांनी प्रत्येकी एक हजार रुपये वर्गणी जमा केली आणि महिला नाका कामगारांच्या जीवनात भाऊबीज साजरी केली.
यावर्षीही म्हणजे सहाव्या वर्षी या महिला कामगारांसाठी भाऊबीज त्यांनी साजरी केली. शास्त्री नगरच्या नाक्यावर नेहमी प्रमाणे प्रथम तीन महिलांना साडी, ब्लाऊज पीस व फराळ देण्यात आले आणि इतर महिलांना ब्लाऊज व फराळाचे पॅकेट वाटप करण्यात आले. पाच वर्षांपूर्वी भाऊबीज म्हणजे काय हे त्यांना समजावून सांगावे लागत होते. आता त्याच महिला मिलिंद सरदेशमुख आणि त्यांच्या सहका-यांना पुढील वर्षी भाऊबीज असेल ना ? असा प्रश्न विचारतात. तेव्हा मिलिंद व त्यांच्या सहकाऱ्यांना मानसिक समाधान मिळतेच आणि त्यांना जगण्याचा अर्थ काय असतो हे कळतं. या कामगार नाक्यावर पुरुष कामगारही असतात, त्यांना फक्त दिवाळी फराळाचे पॅकेट दिले जाते. आजच्या धावपळीच्या आणि फास्टफूड संस्कृतीतही माणुसकी टिकून आहे, ती केवळ अशा सेवाभावी संस्थामुळे, हे कोणालाच नाकारता येणार नाही.

ठाणे शहर स्मार्ट सिटीकडे वाटचाल करीत आहे. या वाटचालीत नाका कामगारांचा मोठा सहभाग आहे. हा सहयोगी कामगार ठाण्यात ३०-४० मजल्याचे टॉवर्स उभे करण्यात मोठे योगदान देतो खरा, पण तोच कामगार टॉवर उभारल्या नंतर बेघर होतो. त्या टॉवर्स मध्ये राहणा-या उच्चभ्रू लोकांना या नाका कामागारांशी काही देणं घेणं नसते. ते त्यांच्या विश्वात असतात. ४०-६० टक्केवारीत बिल्डर दोनशे ते तीनशे टक्के कमाई करत असतो. या कमाईत नाका कामगारांचाही महत्वाचा वाटा असतो. ग्रामीण भागात शेतक-यांना लुटणा-या सावकारांवर कारवाई केली जाते. मात्र नाका कामगारांना लुटणारे बिल्डरांवर सरकार काहीच कारवाई करत नाही. हेच बिल्डर्स निवडणुकीच्या काळात या राजकीय नेत्यांच्या गळ्यातील ताईत असतात. शेवटी काय गरिबांच्या, शेतक-यांच्या आणि कामगारांच्या हिताच्या घोषणा दिवसा करायच्या, पण रात्री उद्योजक, बिल्डर्स, सावकार यांच्याशी सौदा करायचा, ही परंपरा अनेक वर्षे चालूच राहणार आहे. यातूनही काही सेवाभावी संस्था व माणसं माणुसकीचा झरा आटणार नाही याची काळजी घेत आहेत. 'आपल्याकडे आहे ते इतरांशी द्यावे, आनंदी करून सोडावे सकळ जन'... रामदास स्वामींनी हे सांगितले आणि त्याचे आचरण प्रत्यक्षात दिसत आहे. मिलिंद सरदेशमुख आणि त्यांचे सहकारी प्रसाद ठकार, गणेश बकशेटी, समर्थ बकशेटी, कविता ठोंबरे, जितेंद्र सगणे हि सर्व मंडळी शास्त्री नगर येथील नाका कामगारांची भाऊबीज गाजावाजा न करता आपल्याकडे जे आहे ते नाका कामगारांना दरवर्षी देत आहेत. त्यांना सलाम. धन्यवाद!!



## जीवनसाथी-सुयोग्य निवडीसाठी

पुनर्विवाह इच्छुक, मुंबईतील, परदेशातील
उच्च मध्यमवर्गीय, उच्चशिक्षित,
आर्मि, नेव्ही, डिफेन्स, किंचित व्यंगाची
किंवा पालकांत दोष असलेल्या स्थळांसाठी

★★★

**वेळ : रोज सकाळी ११ ते संध्याकाळी ५**

**शुक्रवारी बंद**

**संपर्क : २४३०५६०७**

**मेघा दामले**

इंद्रवदन, पद्माबाई ठक्कर रोड,
सेनाभवनसमोर, माहीम, मुंबई - ४०० ०१६.



## श्री. शरदचन्द्र देशपाण्डे

M.A.L.L.B.

**ADVOCATE**

Asst. Secretary L.I.C. of India Z. O. Hyd. (Retired)
H. No. 8-3-978/13, Shri Nagar Colony, Hyd.

Life Member : अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, मुम्बई
Life Member : अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मण्डळ शाखा, हैद्राबाद
Life Member : मराठी ग्रंथ संग्रहालय, हैद्राबाद
Life Member : महाराष्ट्र मंडळ, तेलंगणा, हैद्राबाद
Life Member : मराठी साहित्य परिषद, तेलंगणा, हैद्राबाद
Life Member : बृहन् महाराष्ट्र मंडळ, नई दिल्ली.
Life Member : Sr. Citizen Seva Samithi, Hanuman Nagar, Hyd.
Treasurer : Sat Sri Keshav Swamy Seva Samithi, Hyd.
Life Member : Insurance Corporate Retired Employees Association
Life Member : Bharat Gunavardhak Sanstha, Hyderabad
Exe. Committee Member : Shankar Vachanalaya, Telengana, Hyd.



ISO 9001 : 2015 प्रमाणित

## समर्थ सहकारी बँक लि.सोलापूर

प्रधान कार्यालय : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. फोन : ०२१७ - २७४४२१०, २७४४२१३, २७४४२१४

## ३००० कोटींच्या मिश्र व्यवसायाकडे वाटचाल

✲ समर्थ बँकेच्या उपलब्ध सेवा ✲

MOBILE BANKING | RTGS/NEFT | IMPS | E-COM/POS | E- PAYMENT | FOREIGN CURRENCY EXCHANGE | LOCKERS | GAS SUBSIDY | BHARAT BILLPAY

**जेष्ठ नागरिकांसाठी व्याजदर ८.७५% (१ वर्षासाठी)**

३२ शाखांमधुन कार्यरत

✲ मुंबई - दादर ०२२- २४३२४४०१/०२ ✲ कल्याण-०२५-१२२३२९२१/२३ ✲ ठाणे - ०२२-२१७३७७४७/४८ ✲ वाशी - ०२२-२७८८००१४/१५
✲ पुणे - शिवाजीनगर - ०२०-२५६५७५५६/२५६५७५६५ ✲ हडपसर - ०२०-२६८९०७१२/१३ ✲ चिंचवड - ०२०-२७३७१८१८/२७३७१९१९
बाणेर ०२०-२७२९२५००/०१ ✲ कोथरूड- ७२७६०८२१०१/७२७६०७२१०२ ✲ सिंहगड रोड- ९८८१७११८३० ✲ पिंपरी-०२०-२७४१२९२९/२७४१३०३०
✲ कोल्हापूर - ०२३१- २५३११४४/४५ ✲ सांगली - ०२३३- २३०२०६५/६६ ✲ मार्केट यार्ड पुणे - ०२०- २९७०६५५०/२९७०५३५०

✲ सोलापूर शहर व जिल्ह्यात एकुण १८ शाखा कार्यरत ✲

**IndusInd Bank**

My ACCOUNT
My NUMBER

# Make your Birth Date

## as your Bank Account Number.

120000 111275

### Our Other Innovations

Indus Mobile
FINGER PRINT BANKING
Easy, Cool & Safe

VIDEO Branch

Choice Money ATM

QUICK REDEEM SERVICE

DIRECT CONNECT

CASH ON MOBILE ATM

CHECK ON CHEQUE

**For more details, please call our 24 x 7 Phone Banking Numbers : 1880 500 5004/ +91 22 4406 6666.**
**Altemately, you can visit our website : www.indusind.com**

MRH

**Mukund R. Hulyalkar**

painttech
CONSULTANTS

**Generations Technology** **Changes BUT** **HULYALKAR SAME**

Visits :

**By Appointment Only**

Available on Phone

9.00 a.m. to 6.00 p.m. (For Local)

10.30 p.m. to 11.30 p.m. (For Outstation)

**Acrylic Distemper 2 Zinc Silicate**

**Complete Paint World**

**"Choice of Bright People"**

**Mukund R. Hulyalkar - Paint Technologist**

| | | |
|---|---|---|
| President | : | Deshastha Rugvedi Brahman Sangh, Dadar |
| I. P. President | : | Colour Society U.D.C.T. Mumbai |
| Secretary | : | Karnataka Progressive Education Society, Mahim, Mumbai |
| Convener | : | ISSPA Central Committee |
| Secretary | : | Govindashram Co-Op. Hsg. Society |
| Patron Member | : | Winner's Circle - Thane |
| Member | : | BIS Committee CHD 20, New Delhi |
| Award | : | Udyogshree By Maharashtra State Government / ISSP Mitra |

Govindashram, (Near Hari Niwas), 224, L. J. Road, Dadar, Mumbai 400 028.
Mobile : 9821099494, Tel. : 022-24456214, Fax : 022-24314865
E-mail : painttech_con@yahoo.com, Website : www.painttechconsultants.com

**R.N.I.16775/68 Regd. No. MCW-126/2018-20,** Published on 15th of every month, Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.


# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

अद्यावत नूतनीकरण केलेली

सर्व सोयींनी उपलब्ध अशी दादर - माहीम विभागातील

## मंगल कार्यालये

- तळमजल्यावरील कै. राधाबाई कब्बूर वातानुकूलीत अद्यावत सोयीयुक्त सभागृह
- दुसऱ्या मजल्यावरील अद्यावत सोयीयुक्त सभागृह

**वैशिष्ट्ये**

वधू-वरांसाठी खोल्या, स्वयंपाकासाठी किचन

मंगल कार्य ठरताच प्रथम खालील ठिकाणी चौकशी करून कार्यालय आरक्षित करा.

सोसायटीच्या सभा, संगीताचे कार्यक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, नाट्य-तालीम, सम्मेलन ह्यासाठी पण हॉल उपलब्ध

**अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ**

लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई - ४०० ०१६.

दुरध्वनी : २४३० २२ ७३ / २४३० ७५७३ • **Email : aadrbm@gmail.com**


मुद्रक, प्रकाशक आणि संपादक समिती यांनी **अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळा**च्या वतीने **संदीप ग्राफीक्स, ठाणे (पश्चिम)** ४०० ६०१, येथे छापून **अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ**, लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहिम, मुंबई - ४०० ०१६ येथून अंक प्रकाशित केला. **संपादक समिती.**